दि. ०६/०७/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेकवक :- श्री चंद्रशेखर राजाभाऊ अन्वीकर, वय ५० वर्ष, पद-दुरुस्ती लिपीक अति.पदभार भूमापक, नेमणुक- उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड, यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ९५००/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री चंद्रशेखर राजाभाऊ अन्वीकर, वय ५० वर्ष, पद-दुरुस्ती लिपीक अति.पदभार भूमापक, नेमणुक-उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड रा. सिल्लोड जि.औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | १५०००/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | ९५००/- |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | मोजणी केलेल्या शेतीच्या हद्दखुणा मोजणी नक्कल तक्रारदारांना उपलब्ध करुन देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे मुळ गावी असलेल्या वडीलोपार्जीत जमिनीचे सात बारा प्रमाणे आ.लो.से. श्री. अन्वीकर यांनी मोजणी केलेली होती. सदर मोजणीच्या हद्दखुणा मोजणी नक्कल तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यासाठी आ.लो.से. श्री. अन्वेकर यांनी १५००० /- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 06/07/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. अन्वीकर यांनी यापुर्वीच रुपये 5000/- स्विकारलेले असून उर्वरीत रक्कम तडजोडीअंती 9500/- रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड समोरील अंजिठा औरंगाबाद रोडवर परशुराम चौकात लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. सिल्लोड शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं.अशोक नागरगोजे, रविंद्र काळे, दत्तात्रय होरकटे चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.